# महात्मा गांधीजी यांचे शिक्षण विषयक विचार

**श्री राजेंद्र वसंत कांबळे,** वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर.

**डॉ. रावसाहेब केराप्पा शेळके,** सहयोगी प्राध्यापक, आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी.

---

**सारांश**

महात्मा गांधी यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाला आध्यात्मिक अधिष्ठान आहे. राजकीय, सामाजिक आणि शिक्षणविषयक विचारसरणी इत्यादीमधून गांधीजींचे जीवनविषयक तत्त्वज्ञान तयार झालेले आहे. महात्मा गांधीजींचे शिक्षण विषयक विचार म्हणजे त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे गतिमान व व्यवहारिक स्वरूप होय. त्यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानामध्ये आदर्शवाद, निसर्गवाद, वास्तववाद आणि कार्यवाद या चारही संप्रदायाचा समन्वय झालेला दिसून येतो.महात्मा गांधीजींनी तत्कालीन शिक्षण पद्धतीमधील दोष ओळखून त्यावर टीका केली.तत्कालीन शिक्षण पद्धतीमध्ये महात्मा गांधीजींना अनेक दोष आढळून आले, त्यावर त्यांनी सखोल विचार केला. आणि या शिक्षण पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणणे आवश्यक आहे हे त्यांनी जाणले.भारतीय समाजाच्या गरजा विचारात घेऊन त्यांनी १९३७ मध्ये वर्धा शिक्षण योजना माडली. महात्मा गांधीजीनी शिक्षणाची ध्येये, अध्ययन - अध्यापन पद्धती, धार्मिक शिक्षण, मुलींचे शिक्षण, शिस्त विषयक संकल्पना यासंदर्भात सविस्तर विचार मांडले आहेत.

**कळीचे शब्द -** शिक्षण, शिक्षणाची ध्येये, अध्ययन अध्यापन पद्धती, धार्मिक शिक्षण, मुलींचे शिक्षण

---

**प्रस्तावना**

महात्मा गांधीजी हे जीवनाचा समग्रपणे विचार करणारे तत्वचिंतक होते. जीवनाची व शिक्षणाची फारकत होऊ शकत नाही हे मर्म गांधीजींनी स्वअनुभवाने जाणले होते. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनाला जर नवे वळण, नवी दिशा द्यायचे असेल, त्यात परिवर्तन घडवून आणायचे असेल तर शिक्षणाकडे अत्यंत बारकाईने लक्ष देणे आवश्यक आहे हा विचार महात्मा गांधीजींना पटला होता. म्हणूनच शिक्षण हे समाज परिवर्तनाचे व नवनिर्मितीचे प्रभावी साधन आहे हा पाश्चात्य शिक्षण तज्ज्ञाचा विचार त्यांनी केवळ अनुसरलाच नाही तर त्याला सक्रिय वाव सुद्धा दिला. शिक्षण म्हणजे तत्त्वज्ञानाचे प्रत्यक्ष आचरण असे ते मानत असत म्हणूनच जीवनाच्या तत्वज्ञानाची कसोटी शिक्षणाच्या प्रत्यक्ष निकषावर त्यांनी घासून पाहिली होती.शिक्षणाशिवाय मनुष्य जवळजवळ पशुतुल्य आहे असे गांधीजींना वाटत होते. महात्मा गांधीजींच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानामध्ये अध्यात्मिकतेला प्राधान्य होते. याचा प्रभाव त्यांच्या शैक्षणिक विचारावर पडलेला दिसून येतो.

**१.शिक्षणाचा अर्थ-** मानव जीवन म्हणजे ईश्वराची सुंदर सृष्टी होय. या मानवाची बौद्धिक, भौतिक व अध्यात्मिक तृप्ती म्हणजे सर्व काही नव्हे म्हणूनच 'सेवा–भावात' शिक्षणाचा खरा अर्थ सामावलेला आहे.

शिक्षण म्हणजे शरीर, बुद्धी, व ऱ्हदय यांचा समतोल विकास घडवून आणणे होय. विद्या म्हणजे केवळ आध्यात्मिक ज्ञान व मुक्ती म्हणजे सुटका, एवढाच 'सा विद्या या विमुक्तये' या मंत्राचा अर्थ करून चालणार नाही. विद्येचा अर्थ म्हणजे लोकांच्या उपयोगी पडणारे सर्व प्रकारचे ज्ञान व मुक्तीचा अर्थ आहे या जीवनातील सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून सुटका करून घेणे. एका अर्थाने शिक्षण म्हणजे मनुष्य घडविण्याची एक प्रक्रिया आहे.त्यामुळे हे शिक्षण केवळ शाळेतच मिळते असे नाही तर जगाच्या शाळेत प्रत्येक क्षणाला येणाऱ्या अनुभवातून प्रत्येक व्यक्ती शिकत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ठिकाणी असलेल्या आंतरिक गुणांच्या प्रकटीकरणात व त्यांना मनुष्य बनविण्याच्या प्रक्रियेत शिक्षणाचा खरा अर्थ सामावलेला आहे.

'महात्मा गांधीजींच्या मते केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे, ती शिक्षणाची सुरुवातही नाही आणि शेवटही नाही. साक्षरता हे मानवाला सुशिक्षित करण्याच्या अनेक साधनापैकी एक साधन आहे'.

'मानवाच्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक अंगामधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय'.

"शिक्षण म्हणजे शरीर, मन आणि आत्मा यांचा सर्वांगीण विकास होय'.
"मानवाचा समतोल सर्वांगीण, सुसंवादी विकास म्हणजे शिक्षण होय".
" 3 H - Head, HandandHeart यांचा विकास म्हणजे शिक्षण होय.
शिक्षण म्हणजे माणूस घडवणे होय. हा विचार महात्मा गांधीजींनी मांडला.

**२. महात्मा गांधीजींची 3H संकल्पना –**

महात्मा गांधीजींनी बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी 3H - Head, Heart and Handही संकल्पना मांडली.

१. **Head -** Head म्हणजे बालकाचा बोधात्मक विकास होय. यामध्ये बुद्धी, विचार, ज्ञाननिष्ठा, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान यांचा समावेश होतो.

२. **Heart -**Heart म्हणजे बालकाचा भावात्मक विकास होय. यामध्ये मन, प्रेम, ऱ्हदय, भावना, समायोजन, सामाजिकता, राष्ट्रनिष्ठा, सहिष्णुता यांचा समावेश होतो.

३. **Hand -**Hand म्हणजे बालकाचा क्रियात्मक विकास होय. यामध्ये हात, पाय, ज्ञानेंद्रिये यांचा विकास, कृती, आचरण, शरीरबल, श्रमप्रतिष्ठा, इंद्रियसंयम यांचा समावेश होतो.

**३. शिक्षणाची ध्येये -**

मानवाचा समतोल व सर्वांगीण विकास साधण्यासाठी महात्मा गांधीजींनी शिक्षणाची तात्कालिक व अंतिम अशी दोन प्रकारची ध्येये सांगितलेली आहेत.

**अ)तात्कालीक ध्येये –**

१. **शिक्षणातून चारित्र्य निर्मिती करणे-** शिक्षणाचे हे सर्वात महत्त्वाचे ध्येय आहे. शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये संयम, सहिष्णुता, सदाचार, आत्मनिर्भयता, सत्याग्रह, धैर्य, स्वावलंबन इत्यादी गुण संक्रमित करावेत. तसेच शिक्षकांनी स्वतःच्या वर्तनाचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवून त्यांच्यामध्ये उच्च प्रतीचे चारित्र्य निर्माण करावे.

२. **बालकांचा सर्वांगीण विकास करणे-** बालकाचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे मूलभूत ध्येय आहे. शिक्षणाच्या माध्यमातून बालकाचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक व अध्यात्मिक विकास साधावा. बालकांमधील विविध क्षमता विकसित कराव्यात आणि त्यांना प्रेरणा द्यावी.

३. **सांस्कृतिक शिक्षण देणे-** महात्मा गांधीजींनी साक्षरतेपेक्षा सांस्कृतिक शिक्षणाला महत्व दिले आहे. त्यामुळे त्यांनी सांस्कृतिक वारसा पुढील पिढीला देणे हे शिक्षणाचे ध्येय मानले आहे. त्यांच्यामते भारतीय संस्कृतीचा अविष्कार होईल अशा स्वरूपाचे शिक्षण द्यावे. त्यातून सांस्कृतिक मूल्यांचा विकास व्हावा आणि समाजाची उंची वाढावी.

४. **उदरनिर्वाहासाठी शिक्षण देणे-** शिक्षणातून व्यक्तीला स्वतःचा उदरनिर्वाह करता आला पाहिजे. व्यक्ती आर्थिकदृष्टया स्वावलंबी झाली पाहिजे. त्यांना आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करता आले पाहिजे. यासाठी व्यावसायिक शिक्षण द्यावे व त्यामधून अर्थोत्पादन करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करावी.

**अ)अंतिम ध्येये -**

१. **व्यक्तीचा आध्यात्मिक विकास साधणे**– महात्मा गांधींजीच्या मते व्यक्तीच्या जीवनाचे अंतिम ध्येय म्हणजे अध्यात्मिक विकास होय. हे ध्येय शिक्षणातून साध्य व्हावे, महात्मा गांधीजी हे समन्वयवादी होते. त्यांची धर्मावर अपार श्रद्धा होती. त्यांनी आदर्शवादाला व्यवहारिकतेची जोड दिली होती.

२. **सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे -** व्यक्ती व समाज यांचे ध्येये एकमेकांस पूरक असावीत. समाजाशिवाय व्यक्तीची प्रगती होऊ शकत नाही आणि व्यक्तीच्या प्रगतीशिवाय समाजाची आणि राष्ट्राची प्रगती करता येत नाही. दोघांची प्रगती एकमेकांवर अवलंबून आहे. शिक्षण हे सामाजिक वातावरणस पूरक असावे. त्यातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करावी.

**४. अध्ययन - अध्यापन पद्धती -** कृतीद्वारा शिक्षण, प्रश्नोत्तर पद्धती, अनुकरण पद्धती, समवाय पद्धती, व्याख्यान पद्धती, निरीक्षण पद्धती, शाब्दिक पद्धती, कथाकथन पद्धती, सामाजिक परिस्थितीतून शिक्षण,

हस्यव्यवसायाद्वारे शिक्षण, कला शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षण, स्वंयअध्ययन पद्धती, स्वअनुभवातून शिक्षण यावर महात्मा गांधीजींनी भर दिला होता.

**५. महात्मा गांधीजीं यांचे शैक्षणिक प्रयोग** –

**१.शैक्षणिक प्रयोगास प्रारंभ -** १८९७ पासून महात्मा गांधीजींनी आपल्या शैक्षणिक प्रयोगास प्रारंभ केला.

**२.फिनिक्स आश्रमाची स्थापना -**महात्मा गांधीजींनी १९०४ मध्ये दक्षिण आफ्रिकेत फिनिक्स आश्रमाची स्थापना केली होती.

**३. हिंद स्वराज्य पुस्तक -**१९०८ मध्ये महात्मा गांधीजींनी आपले शिक्षणविषयक विचार हिंदूस्वराज्य या पुस्तकामध्ये प्रसिद्ध केले होते.

**४.टॉलस्टॉय आश्रम -** १९११ मध्ये रशियन तत्वज्ञ टॉलस्टॉय यांच्या नावाने दक्षिण आफ्रिकेतील ट्रान्सवाल या ठिकाणी टॉलस्टॉय फॉर्मची स्थापना केली नंतर ते आश्रम म्हणून प्रसिद्धीस आला.

**५.साबरमती आश्रमाची स्थापना -** १९१५ मध्ये साबरमती आश्रमात शैक्षणिक कार्य सुरू केले.

**६. सत्याग्रह आश्रमाची स्थापना-**१९१५ मध्ये गुजरातमधील अहमदाबाद जवळ कोचराब (कोचिलर) येथे सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली.

**७.ग्रामशिक्षणाची सुरुवात -**बिहारमधील चंपारण्य या ठिकाणी १९१७मध्ये महात्मा गांधीजींनी ग्रामशिक्षणाची सुरुवात केली.

**८.गुजरात विद्यापीठाची स्थापना-**१९२१मध्ये महात्मा गांधीजींनी गुजरात विद्यापीठाची स्थापना केली. या विद्यापीठाचे 'सा विद्या या विमुक्तये' हे बोधवाक्य होते.

**९.सेवाग्राम आश्रमाची स्थापना -** १९३६ मध्ये वर्धा पासून जवळ असलेल्या सेवाग्राम (शेगाव) जवळ महात्मा गांधीजींनी सेवाग्राम आश्रमाची स्थापना केली.

**१०.वर्धा शिक्षण योजना -** १९३७ मध्ये महात्मा गांधीजींनी वर्धा या ठिकाणी मुलोद्योगी शिक्षणाची योजना मांडली. त्यालाच वर्धा शिक्षण योजना म्हणतात.

**११.हरिजन साप्ताहिक -**महात्मा गांधीजींनी आपले शैक्षणिक विचार हरिजन साप्ताहिकातून मांडले होते. त्यांनी ३१जुलै १९३७ मध्ये हरिजन साप्ताहिकामध्ये लेख लिहून सरकारचे शिक्षणाकडे लक्ष वेधले होते.

**१२.हरिपूर अधिवेशन -** १९३८मध्ये हरिपूर येथे भरलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात मुलोद्योगी शिक्षण पद्धतीला (वर्धा शिक्षण योजना) राष्ट्रीय शिक्षण पद्धती म्हणून घोषित केले.

**१३.3H कल्पना -**महात्मा गांधीजींनी बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी 3H-Head, HandandHeartही कल्पना मांडली.

**६.महात्मा गांधीजींचे स्त्री शिक्षणविषयक विचार -** महात्मा गांधीजी स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान असावे, एक स्त्री शिकली तर कुटुंब शिकल्यासारखे आहे. स्त्रियांची पारतंत्र्यातून सुटका करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी साधन आहे. स्त्रियांचा शिक्षणक्रम वेगळा असावा. स्त्रियांच्या शिक्षणामध्ये सांस्कृतिक शिक्षणाला महत्व द्यावे, स्त्रियांच्या शिक्षणाची विशेष व्यवस्था करावी. स्त्रिया आणि पुरुष परस्परपूरक आहेत त्यांचे जीवन एकमेकावर अवलंबून आहे. स्त्रियांनासंगीत,वाड:मय, कला, गृहउद्योग यांचे शिक्षण द्यावे असे विचार महात्मा गांधीजी यांनी मांडले.

**७.महात्मा गांधींजी यांचे धार्मिक शिक्षणविषय विचार-** महात्मा गांधीजींनी धार्मिक शिक्षणाचा व्यापक अर्थ लावला होता. जीवनाला धर्माची अत्यंत आवश्यकता आहे. धर्महीन जीवन म्हणजे तत्वशून्य जीवन आहे. धर्म म्हणजे सत्य, प्रेम, न्याय, शिव व सौंदर्य या शाश्वत मूल्यावर श्रद्धा होय. धर्माबद्दल प्रेम असावे, धर्माप्रमाणे वागावे पण डोळसपणे. विविध धर्मात सांगितलेली निधीतत्वे, मूलतत्त्वे एकच आहेत. विश्वातील अंतिम तत्वाचा शोध घेणे हा धर्माचा भाग आहे. विद्यार्थी माणुसकीच्या धर्माचे उपासक व्हावेत, विद्यार्थ्यांनी सर्वधर्मीय प्रार्थना म्हणावी, विश्वातील मानव जसा एक आहे तसा विश्वधर्म एकच आहे. सर्व धर्माबद्दल समान आदर असावा. धार्मिक शिक्षण

एखाद्या विशिष्ट धर्माचे किंवा पंथाचे असू नये. धर्माबद्दल समानतेची भावना जोपासण्यासाठी धार्मिक शिक्षण महत्वाचे आहे असे विचार त्यांनी मांडले आहेत.

**८. महात्मा गांधीजींची शिस्तविषयक संकल्पना -** विद्यार्थ्यांच्या भावना आणि विचार यावर शिक्षकांचे नियंत्रण असावे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पूर्णपणे समजून घ्यावे. विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षा करू नये, शिस्त असावी मात्र ती कडक असू नये, स्वातंत्र्याबरोबर शिस्त आणि नम्रता आवश्यक आहे. शिस्तही लोकशाहीचे सार असून ती सामुदायिक स्वातंत्र्याची पहिली गरज आहे. सामूहिक शिस्तीची आवश्यकता आहे. शिस्तीच्या संदर्भात भेदभाव करू नये, शारीरिक शिक्षा हा बेशिस्तीवरील उपाय नाही. विद्यार्थ्यांकडून स्वयंप्रेरणेनेशिस्तीचे पालन व्हावे. शिस्तीसाठी वेगळे प्रयत्न करण्याची आवश्यकता भासू नयेअशा स्वरूपाचे शिस्तविषयक विचार महात्मा गांधींजीनी मांडले आहेत.

**९.महात्मा गांधींजी यांचे लैंगिक शिक्षणविषय विचार -** महात्मा गांधींजी यांनी लैंगिक शिक्षणाचा पुरस्कार केला होता. त्यांच्या मते कामवासनेवर विजय मिळवणे आणि कामप्रवृत्तीचे उन्नयन करणे हा लैंगिक शिक्षणाचा प्रमुख हेतू असावा. या शिक्षणामुळे मुलांच्या मनावर मनुष्य आणि पशू यांच्यातील महत्त्वपूर्ण फरक चांगला ठसतो. बुद्धी आणि भावना यामुळे मनुष्याचे श्रेष्ठत्त्व समजते. मनुष्याची बुद्धी भावनांना चेतवते, अशा भावनांना योग्य वाटदाखविण्यात व त्यांचे उन्नयन करण्यातच शिक्षणाचे महत्त्व आहे असा विचार त्यांनी मांडला.

**१०. महात्मा गांधींजी यांचे शारीरिक शिक्षणविषय विचार -** शाळेमध्ये शारीरिक शिक्षण सक्तीचे करावे यावरमहात्मा गांधींजी यांनी भर दिला होता. व्यायाम व खेळ यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे ठिकठिकाणी व्यायाममंदिरे स्थापन करावीत असा विचार त्यांनी मांडला.

**समारोप -** महात्मा गांधींजी यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान अनमोल आहे.त्यांच्या शिक्षणविषयक विचारामध्ये नवीन दृष्टिकोन दिसून येतो. स्त्रीशिक्षण, लैंगिक शिक्षण, कला शिक्षण, धार्मिक शिक्षण, शिक्षणाचे माध्यम याबाबत मांडलेले विचार अत्यंत पुरोगामी आहेत. महात्मा गांधीजींचे शिक्षण क्षेत्रातील स्थान अनन्यसाधारण आहे. महात्मा गांधीजींनी शिक्षण प्रक्रियेत संगीत शिक्षण, शारीरिक शिक्षण यांनाही महत्त्वाचे स्थान दिले होते. शिक्षण व श्रम याची योग्य सांगड घालून आदर्श जीवन व्यतीत करता आले पाहिजे यासाठी उद्योगाद्वारे शिक्षण त्यांना अभिप्रेत होते. आपल्या विविध अनुभवांचा, विचारांचा सामान्य जनतेला जास्तीत जास्त उपयोग व्हावा व त्यातून त्यांची उन्नती व्हावी ही निखळ व निस्वार्थी अपेक्षा बाळगणारे महात्मा गांधींजी एक महान शिक्षणयोगी होते.

**संदर्भ**

1. कुंडले, म. बा. (१९८६) शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र. पुणे, श्रीविद्या प्रकाशन.
2. भगत, रा. तु. (२००५) शिक्षणातील थोर विचारवंत. कोल्हापूर, चैतन्य प्रकाशन
3. माळी, अ.ल. आणि भगत,रा.तु. (१९७८) थोर शिक्षणतज्ज्ञ. पुणे, गो.य. प्रकाशन
4. पवार, जयसिंगराव (१९९९) हिंदुस्थानच्या स्वांतत्र्य चळवळीचा इतिहास. कोल्हापूर, फडके प्रकाशन
5. पवार,ना.ग. (२००७) उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षणतज्ज्ञ. पुणे, नित्यनूतन प्रकाशन
तांबोळी, शमसुद्दिन आणि तांबोळी, बेनझीर (२०११) प्रभावशाली शिक्षणतज्ज्ञ. पुणे, डायमंड प्रकाशन
6. राजमाने, कस्तुर चंद्रकांत (२०११) शिक्षणातील थोर विचारवंत : एक चिंतन. नाशिक, इनसाईट पब्लिकेशन्स
7. पवार, वैशाली (२०१४) आधुनिक भारतीय राजकीय विचार. पुणे, डायमंड पब्लिकेशन्स
8. https://hindisuccessstories.in/mahatma-gandhi-education-thoughts
9. https://bharatdiscovery.org/india
10. https://www.hindikeguru.com/2022/06/mahatma-gandhi-ke-shaikshik-vichar.html